-5 SEP 2010

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# केंद्रीय जल आयोगामार्फत नियोजन हवे



कोल्हापूर, सांगली जिल्ह्यात आलेल्या महापुराने पर्यावरणाचा समतोल बिघडल्याचे दाखवून दिले आहे. चार महिन्यात टप्प्याटप्प्याने पडणारा पाऊस चार दिवसात पडत असेल तर गंभीर आहे. प्रत्येकाने आपली धरणे भरण्याला प्राधान्य दिल्याने ही परिस्थिती उदभवली. केंद्रीय जल आयोगामार्फतच याचे नियोजन होणे आवश्यक आहे. पर्यावरणाचा अभ्यास करुन अंदाच वर्तवून इशारा देणारी सक्षम यंत्रणा राज्याकडे आहे. मात्र या यंत्रणेच्या पलिकडेही निसर्ग आहे. हे महापुराने दाखवून दिले. महापुरानंतर अनेक प्रश्न तयार झाले आहेत. रेड झोन, यलो झोन यावर चर्चा सुरु आहे. मात्र ही निरर्थक म्हणावी लागेल. यापलीकडेही अनेक प्रश्न तयार झाले आहेत. प्रामुख्याने प्रदुषणाचा प्रश्न गंभीर झाला आहे. आतापासूनच गंभीर होवून उपाययोजना करण्याची गरज आहे. साध्या साध्या गोष्टीतून ते शक्य आहे. यासाठी सामुहीक प्रयत्न आवश्यक आहे. उत्सवाच्या काळात प्रामुख्याने जल प्रदुषण होत असते. वातावरणात हरीत गॅस वाढला आहे. हे प्रदुषणाचे मुख्य कारण आहे. महापूर आला तर शहरातील दुषीत पाणी, वस्तू, निर्माल्या पुराच्या पाण्यात मिसळते हेच पाणी काही काळानंतर पिण्यासाठी वापरले जाते. आरोग्यचे प्रश्न निर्माण होवू शकतात हे टाळण्यासाठी पुरावर नियंत्रण ठेवून शहरातील दुर्गंधी पाण्यात मिसळणार नाही. याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

**-डॉ. पी. डी. राऊत, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.**



कुंभी-कारखान्यावर कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन करताना आमदार चंद्रदीप नरके, पै. संभाजी वरुटे, डी. एन. देसाई, आदी.

# विभागीय कुस्ती स्पर्धेस कुंभी-कासारीवर प्रारंभ

म. टा. वृत्तसेवा, कुडित्रे

कळे (ता. पन्हाळा) येथील विठ्ठलराव पाटील महाविद्यालयाच्या पुढाकाराने कुडित्रे येथील कुंभी-कासारी साखर कारखान्याच्या पै. युवराज पाटील कुस्ती संकुलात शिवाजी विद्यापीठ विभागीय कुस्ती स्पर्धेस बुधवारी प्रारंभ झाला. स्पर्धेचे उद्घाटन आमदार चंद्रदीप नरके यांच्या हस्ते झाले.

स्पर्धा फ्री स्टाईल व ग्रिकोरोमन अशा दोन प्रकारांत होणार असून कोल्हापूर जिल्ह्यातील ४० महाविद्यालयांतील १५० मल्लांनी सहभाग नोंदवला आहे. पहिल्या दिवशी फ्री स्टाईल ६५ किलो वजनी गटात प्रकाश पाटील, अनिकेत पाटील, हरी शेलार व ५७ किलो गटात ओंकार लाब, सौरभ पाटील विजयी झाले.

यावेळी महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे विभागीय सचिव संभाजी वरुटे, शिवाजी विद्यापीठ क्रीडा परिषद सचिव डी. एन. देसाई, विठ्ठल पाटील, राहुल पाटील, सरिता पाटील, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

5 SEP 2010

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ विभागीय कुस्ती स्पर्धेस प्रारंभ

**बाकरे :** कुडित्रे (ता. करवीर) येथील कुंभी-कासारी सहकारी साखर कारखान्याच्या पैलवान युवराज पाटील कुस्ती संकुलात शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर विभागीय फ्री स्टाईल कुस्ती स्पर्धेचा शानदार शुभारंभ झाला. कुंभीचे कासारी साखर कारखान्याचे चेअरमन आमदार चंद्रदीप नरके, प्राचार्य डॉ. बाळासाहेब लाडगांवकर, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विठ्ठल पाटील यांच्या हस्ते प्रतिमापूजन व आखाडापूजन करून स्पर्धेस प्रारंभ झाला. या स्पर्धसाठी कोल्हापूर विभागातील ४० हून अधिक महाविद्यालयांच्या २०० कुस्तीगीरांनी सहभाग नोंदवला आहे.

**कुंभी-कासारी कुस्ती संकुलात रंगणार स्पर्धा**

आमदार नरके यांनी युवराज पाटील संकुलात मानधनधारक कुस्ती स्पर्धा, विभागीय शालेय स्पर्धा, शिवाजी विद्यापीठ विभागीय कुस्ती स्पर्धाचे आयोजन केल्याचे सांगून मल्लविद्येला प्रोत्साहन देण्याचे हे केंद्र असल्याचे ते म्हणाले. यावेळी महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती पुरस्कार विजेते पै. संभाजी वरुटे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पै. संभाजी पाटील, राहुल पाटील, संयोजक प्रा. विक्रम यमगेकर, तसेच प्रा. बाजीराव पाटील व मान्यवर उपस्थित होते.

**स्पर्धा गटवार निकाल पुढीलप्रमाणे-**


(उपांत्य फेरीसाठी पात्र) ५७ किलो गट : ओंकार लाड (राधानगरी), सौरभ पाटील (भोगावती), ६५ किलो: अजित पाटील, (तिसंगी), किशोर पाटील (महावीर कॉलेज), प्रकाश पाटील (कळे).

लोकमत

Happy Teachers Day

# शिक्षकांच्या संस्कारांमुळे आयुष्य घडले

## शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांचे जिल्हा परिषदेच्या शाळांतून शिक्षण; विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी कामाची प्रेरणा



कोल्हापूर : अभ्यासू, शिस्तीच्या आणि प्रेमळ शिक्षकांनी मला घडविले. आव्हानांना धाडसाने सामोरे जाण्याची वृत्ती माझ्यात सर्व शिक्षकांच्या संस्कारांमुळे विकसित झाली. त्यांच्यामुळेच आपल्या शिष्यांना सर्वोत्कृष्ट ज्ञान देऊन उत्तम नागरिक म्हणून घडविण्याची जबाबदारी अध्यापक म्हणून आहे, ही जाणीव सदैव मनी जागृत असते. विद्यार्थ्यांच्या रुपाने या देशाचे भवितव्य घडवायचे आहे, याची तीव्र जाणीव होत राहते. ती मला सतत अस्वस्थ ठेवते आणि विद्यार्थ्यांसाठी, या देशाच्या उज्ज्वल भवितव्यासाठी उत्तम काम करण्याची प्रेरणा देत राहते. ही जाणीव माझ्या सर्व गुरुंची देण असल्याचे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी सांगितले.



**शिक्षक एस. ए. जाधवर यांच्याकडून जे काम करावे, ते उत्तमच असावे, असा वस्तुपाठ मी घेतला.**



डॉ. देवानंद शिंदे

वडिलांच्या बदलीमुळे औसा, निलंगा, परांडा, लातूर, उपळा, उद्‌गीर येथील जिल्हा परिषदेच्या शाळा, महाविद्यालयांत मी शिकलो. तेथे अनेक शिक्षक शिकवायचे; मात्र त्यातल्या चार-पाच लोकांचा माझ्यावर आजीव प्रभाव पडला. त्यातील सर्वांत प्रभावशाली शिक्षक म्हणजे गणिताचे आर. एन. खडप. विद्यार्थ्यांच्या केवळ चेहऱ्यावरुन त्याला गणित समजले आहे की नाही, हे ते ओळखायचे. प्रत्येक मुलाला जोपर्यंत गणित समजत नाही, तोपर्यंत ते घोटून घोटून शिकवायचे. त्यांच्यामुळेच मीसुद्धा चेहरा पाहून माणसे ओळखण्याचे कसब साध्य केले. गायकवाड यांच्यामुळे शब्दांचे बारकावे, शब्दांचे सामर्थ्य माझ्या ध्यानात आले.

**शिक्षकाविना आयुष्य घडले नसते...**

### आई माझ्यासाठी आद्यगुरु

जीवनाचे तत्त्वज्ञान शिकविणारे शिक्षण मला आई नागरबाई आणि वडील बाबूराव यांनी दिले. वडील पोलीस खात्यात होते. त्यांच्या कामाच्या वेळा आणि धावपळ यातून त्यांना कुटुंबासाठी फार वेळ देता येत नसे. ही कसर आईने भरुन काढली. समाजजीवनातील एक जबाबदार, सुसंस्कारित व्यक्ती म्हणून माझे व्यक्तिमत्त्व घडविण्याचे काम तिने केले, म्हणून आई माझी आद्यगुरु आहे.

आम्ही पोलीस लाईनमध्ये राहायचो. खडप सर दर महिन्याला माझ्या वडिलांना एक पोस्टकार्ड पाठवायचे. त्यात 'तुमचा मुलगा चांगला आहे. त्याची अभ्यासात प्रगती चांगली आहे. त्याच्या शिक्षणाचं बंडाळ (नुकसान) होऊ देऊ नका,' अशी कळकळीची भावना व्यक्त केलेली असायची. माझ्या वडिलांनी खूप वेळानंतर मला ही गोष्ट सांगितली. शालेय, महाविद्यालयीन जीवनात शिक्षकांनी शिक्षणासाठी पाठबळ दिले, संस्कार केले; त्यामुळे शिक्षण क्षेत्रातील उच्चपदावर काम करता आले. शिकलो नसतो, तर ढोरांमागे जावे लागले असते, असे डॉ. शिंदे यांनी सांगितले.

### गुरु : साक्षात परब्रह्म

आदर्श शिक्षक कसा असावा, याचा तत्त्वज्ञानात्मक वस्तुपाठ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांनी आपल्या आयुष्यात घालून दिला. शिवाजी विद्यापीठाची स्थापना होताना विद्यापीठाला या महान शिक्षकाचे आशीर्वाद लाभले. याच परंपरेला अनुसरुन माझ्या गुरुंनी मला घडविले. त्यांचे कृपाशीर्वाद म्हणूनच मलाही ज्ञानदानाच्या क्षेत्रात कार्य करण्याची संधी लाभली असल्याचे डॉ. शिंदे यांनी सांगितले.

# कुंभीवर विद्यापीठाच्या विभागीय कुस्ती स्पर्धेचा प्रारंभ

## ३० महाविद्यालयांचा समावेश; २०० खेळाडूंचा सहभाग

**कोगे / प्रतिनिधी :**

कुडित्रे (ता. करवीर) येथील कुंभी-कासारी सहकारी साखर कारखान्याच्या कार्यस्थळावर युवराज पाटील कुस्ती संकुलात शिवाजी विद्यापीठअंतर्गत विभागीय फ्री स्टाईल कुस्ती स्पर्धेचा प्रारंभ झाला. कुंभीचे चेअरमन आमदार चंद्रदीप नरके, प्राचार्य डॉ. बाळासाहेब लाडगावकर, विठ्ठल पाटील यांच्या हस्ते प्रतिमा पूजन व आखाडा पूजन करून मान्यवरांच्या उपस्थितीत या स्पर्धेचा प्रारंभ झाला. या स्पर्धेसाठी कोल्हापूर विभागातील ३० हून अधिक महाविद्यालयांचा समावेश असून जवळपास २०० स्पर्धकांनी सहभाग नोंदवला आहे. स्पर्धा तीन दिवस चालणार आहेत.

आ. नरके म्हणाले, विभागीय कुस्ती स्पर्धांचे याअगोदरही आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठअंतर्गत स्पर्धा दुसऱ्यांदा होत आहेत. मल्लविद्येला प्रोत्साहन देण्याचे हे केंद्र आहे. दरम्यान, महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती पुरस्कार विजेते पै. संभाजी वरुटे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पै. संभाजी पाटील, संस्थेचे अध्यक्ष विठ्ठलराव पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष राहुल पाटील, संयोजक प्रा. विक्रम यमगेकर, पंच प्रा. बाजीराव पाटील, राजाराम चौगले, बबन चौगले, कृष्णात पाटील, तानाजी पाटील, विलास पाटील, संदीप पाटील, प्रकाश पाटील आदी उपस्थित होते.

स्पर्धा निकाल गटानुसार असा : (उपांत्य फेरीसाठी पात्र) ५७ किलो गट : ओंकार लाड (राधानगरी), सौरभ पाटील (भोगावती), ६५ किलो गट : अजित पाटील (तिसंगी), किशोर पाटील (महावीर कॉलेज), प्रकाश पाटील (कळे).

# विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेत बिद्री दूधसाखर महाविद्यालय प्रथम

**बिद्री :** शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेत विज्ञान विद्याशाखेतून ग्रामीण गटात दूधसाखर महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला. त्यानिमित्त शिवाजी विद्यापीठात प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली आणि कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर व प्रभारी परीक्षा नियंत्रक पळसे यांच्या उपस्थितीत दूधसाखर महाविद्यालयाचा गौरव झाला. हा गौरव महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य संजय पाटील, डी. एन. पाटील, डी. डी. कोमेजवार यांनी स्वीकारला.